**<u>वादीतर्फे साक्षिदार क्र.१ चा उलटतपास प्रतिवादी क्र.२ व ३ तर्फे ॲड. श्री.पी.एम. राठी वकिलांमार्फत शपथेवर सुरू :–</u>**

१. मी सन–२०१७ पासून वादी संस्थेत नोकरी करीत असून मी सध्या व्यवस्थापक पदी आहे. माझ्या व्यतिरीक्त वादी संस्थेत दोन कर्मचारी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ठराव (निशाणी क्र.३०) व्यतिरीक्त कोणत्याही ठरावाद्वारे मला प्रस्तुत प्रकरण चालविण्यासाठी अधिकार प्राप्त नाही. ठराव (निशाणी क्र.३०) मध्ये प्रस्तुत प्रकरण प्रतिवादी क्र.१ विरूध्द चालविण्याबाबत त्याचे नाव नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, ठराव (निशाणी क्र.३०) मध्ये प्रदिप रामदास येडके असे नाव नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी क्र.१ चे नाव प्रविण भगवानदास येडके असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र.३० मध्ये नमुद केलेल्या इसमांविरूध्द /सभासदांविरूध्द प्रकरण दाखल करण्याचे अधिकार देण्यात आले आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र.३० मध्ये प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्या नावांचा उल्लेख नाही.

२. कर्ज वाटप करतांना कर्जदारांकडून वादी संस्था केवळ कर्ज रोखा घेत होते. माझ्या दाव्यातील परीच्छेद क्र.५ मधील नमुद सर्व दस्तऐवज मी अभिलेखावर दाखल केले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रस्तुत प्रकरणातील अभिलेखावर जमानतदाराचे स्वीकृतीपत्र, वचनचिठ्ठी, करारपत्र इ. नमुद केलेले दस्त दाखल केले नाहीत. प्रस्तुत प्रकरणात वादी संस्थेने कर्जदारांकडून अथवा जमानदारांकडून वचनचिठ्ठी घेतली नव्हती. हे

मला माहिती नाही की, निशाणी क्र.२९ साठी मुद्रांक शुल्क लागतो किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र.२९ मध्ये कोणताही मुद्रांक शुल्क लावण्यात आला नाही. वादीच्या वार्षिक आमसभेमध्ये ठरविल्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणात कर्जावरील व्याजाचा दर आकारण्यात आला आहे. हे म्हणणे खरे आहे की, कर्जाच्या व्याजापोटी प्रतिवादी क्र.१ ते ३ सोबत वादी संस्थेचा कोणताही ठराव झाला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, वादी संस्थेच्या वार्षिक ठरावाची प्रत मी अभिलेखावर दाखल केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ ला वादीकडून मंजुर झालेल्या कर्जाचे विवरण झाल्याबाबतचा ठराव अभिलेखावर दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र.२९ मध्ये प्रतिवादी क्र.२ च्या सही समोरील तारीख २७.०९.२०१६ अशी नमुद करण्यात आली आहे. प्रस्तुत प्रकरणातील कर्जाचे वाटप दिनांक २७.०९.२०१६ रोजी करण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, कर्जरोखा (निशाणी क्र.२९) मध्ये तथाकथीत कर्ज देण्यापूर्वीची तारीख म्हणजे दिनांक २७.०८.२०१६ अशी नमुद करण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र.२९ च्या पान क्र.२ वर कर्ज मंजुर/नामंजुर चा रकाना रिकामा आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत प्रकरण चालविण्याकरीता वादी संस्थेने मला अधिकार दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र.३० मध्ये प्रतिवादी क्र.१ ते ३ चे नाव नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुतचे प्रकरण मी विना अधिकार न्यायालयात दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत प्रकरणात वचनचिठ्ठी नसल्याने प्रस्तुत प्रकरण हे मुदतबाह्य आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्र.२ व ३ च्या खोट्या सह्या निशाणी क्र.२९

वर मारून त्यांना खोट्या प्रकणात गोवले. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे निशाणी क्र.२९ वगळता इतर दस्तांवर प्रतिवादी क्र.२ व ३ च्या सह्या नाहीत.

३. आता मला माझ्या दाव्यातील परीच्छेद क्र.२ मधील अधोरंकीत भाग–अ वाचुन दाखविण्यात आला, तो बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या अधोरेखांकीत भाग–अ मध्ये व इतर दाव्यातील कर्जाच्या रकमेमध्ये विसंगती आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्र.२ व ३ च्या खोट्या व बनावटी सह्या करून त्यांना प्रस्तुतच्या खोट्या प्रकरणात समाविष्ट केले. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

(प्रतिवादी क्र.१ व ४ यांचा दुपारी ४ वाजेपर्यंत वारंवार पुकारा केला असता ते गैरहजर, त्यामुळे त्यांच्यातर्फे कोणताही उलटतपास नाही.)

उलटतपास संपला.
फेरतपास काही नाही.

समक्ष

**Sd/-**

दिनांक: ३०.०६.२०२६
ठिकाण: अकोला

(व्ही. व्ही. जोशी)
न्यायाधीश
सहकार न्यायालय, अकोला.